सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२

Website:-www.doa.maharashtra.gov.in 				Email:-directorateofart@gmail.com

**क्रमांक:-डिओअे-२०२६/तीन/E-३४५३६१०**

## परिपत्रक

विषय : **६६ वे महाराष्ट्र राज्यकला प्रदर्शन २०२६-२७.**
कलाकार विभागाचे अर्ज व माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करणेबाबत .

महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक उपक्रम म्हणून दरवर्षी शासनाच्या वतीने कला संचालनालयामार्फत महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन आयोजित करण्यात येते. त्यानुसार सन २०२६-२७ या वर्षाचे कलाकार विभागाचे ६६ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन दि.०९.०३.२०२७ ते दि.१५.०३.२०२७ या कालावधीत जहांगीर आर्ट गॅलरी, मुंबई येथे आयोजित केले जाणार आहे. त्या संदर्भातील माहितीपत्रक या पत्रासोबत जोडले असून राज्य कला प्रदर्शनामध्ये सहभागासाठी ऑनलाईन अर्ज कला संचालनालयाच्या doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि.१६.११.२०२६ पासून ऑनलाईन पध्दतीने खाली नमूद तपशिलाप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येतील.

| ऑनलाईन पध्दतीने कलाकृती स्विकारण्याचा कालावधी | ऑनलाईन पध्दतीने कलाकृती स्वीकारण्याचे संकेतस्थळ | ऑनलाईन इमेज साईज | फाईल फॉरमॅट |
|---|---|---|---|
| दि.१६.११.२०२६ ते दि.२३.११.२०२६ | doa.maharashtra.gov.in | डिजिटल इमेज ही 'JPEG' फॉरमॅटमध्ये असावी. प्रतिमेचा आकार (Image Size) किमान २१०० पिक्सेल असावा आणि तो कमाल २५०० पिक्सेलपेक्षा अधिक नसावा." | "डिजिटल इमेज ही 'JPEG' फॉरमॅटमध्येच असावी. इमेज फाईलचे नाव (File Name) खालील नमुन्याप्रमाणे असावे: **कलाकाराचे नाव_विभाग_कलाकृतीचे शीर्षक_कलाकृतीचे माध्यम_कलाकृतीची किंमत**" |

२. कलाकाराने ऑनलाईन कलाकृती सादर करताना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला महाराष्ट्राचा अधिवास दाखला अपलोड करणे **बंधनकारक** आहे. अन्यथा कलाकृती बाद केली जाईल.

६. सुरुवातीला ऑनलाईन डिजिटल इमेजेसवरून प्रदर्शनासाठी कलाकृतींची प्राथमिक निवड केली जाईल. निवडक कलाकृतींची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध होईल.

७. प्राथमिक फेरीत निवडलेल्या कलाकृती ठरवून दिलेल्या तारखेला व ठिकाणी प्रत्यक्ष (Physical) स्वरूपात जमा कराव्या लागतील. त्यातून अंतिम पारितोपिकांसाठी कलाकृतींची निवड केली जाईल.

८. कोणत्याही बदलांची किंवा अद्ययावत माहितीसाठी doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला वेळोवेळी भेट द्यावी.

प्रदर्शनाच्या अनुपंगाने अटी शर्तींचे माहितीपत्रक सोबत जोडले आहे.

Digitally signed by
Kishor Digambar Ingale
Date: 05-10-2026
18:47:12

(डॉ.किशोर इंगळे)
कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१. प्रदर्शन अधिकारी, ६६ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन २०२६-२७
२. निवड नस्ती.

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## ६६ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन २०२६-२७

## कलाकार विभाग

### ऑनलाईन पध्दतीने व प्रदर्शनासाठी निवड झालेल्या कलाकृती सादर करण्याकरिता माहितीपत्रक / सुचना / नियम व अटी

महाराष्ट्रातील विविध कलाकारांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र शासनातर्फे सन १९५६ पासून दरवर्षी 'महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन' ही महत्त्वाची सांस्कृतिक योजना राबविली जात आहे. यंदाचे कलाकार विभागाचे ६६ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन खालील ५ विभागांमध्ये आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे:

१) रेखा व रंगकला
२) उपयोजित कला
३) शिल्पकला
४) मुद्राचित्रण
५) दिव्यांग कलाकार विभाग

या विभागांमध्ये निवडल्या जाणाऱ्या उत्कृष्ट कलाकृतींना पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात येईल.

**अटी व नियम :-**

१) प्रदर्शनातील सहभाग आणि पारितोषिक निवडीबाबत मुख्य समितीचा निर्णय अंतिम राहील; यावर कोणताही वाद किंवा आक्षेप स्विकारला जाणार नाही.

२) **स्पर्धक महाराष्ट्राचा कायमस्वरूपी रहिवासी असणे अनिवार्य आहे. उमेदवारांनी** doa.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावरील अधिकृत लिंकवर आपला अधिवास दाखला (**Domicile Certificate) **अपलोड करावा. कलाकृतीची प्रदर्शनासाठी निवड झाल्यास, ती प्रत्यक्ष सादर करताना मूळ अधिवास दाखला जोडणे बंधनकारक राहील. दाखला सादर न केल्यास संबंधित कलाकृती स्पर्धेतून बाद करण्यात येईल. हा दाखला केवळ सक्षम शासकीय प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित केलेलाच असावा.**

३) या माहितीपत्रकातील नमूद केलेले सर्व नियम व अटीची पुर्तता न झाल्यास प्रदर्शनासाठी पाठवलेल्या कलाकृती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४) प्रत्येक विभागाकरिता रु.२००/- प्रवेश फी ऑनलॉईन स्वरुपात स्विकारण्यात येईल. प्रत्येक विभागात दोन पेक्षा अधिक कलाकृती पाठविता येणार नाहीत. अंशकालीन वगळता इतर कोणत्याही कला शाखेत विद्यार्थी म्हणून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना कलाकार विभागात भाग घेता येणार नाही.

५) **राज्य कला प्रदर्शनात ज्या कलाकारांना एकाच विभागामध्ये यापूर्वी तीन वेळा पुरस्कार मिळालेला आहे, अशा कलाकारांच्या कलाकृतींचा पुनश्च पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही. तसेच, यापूर्वी महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात निवड झालेल्या किंवा प्रदर्शित झालेल्या कलाकृती या प्रदर्शनासाठी पुन्हा सादर करू नयेत. तसे आढळल्यास संबंधित कलाकृती तात्काळ प्रदर्शनातून आणि स्पर्धेतून बाद करण्यात येईल.**

६) **कला प्रदर्शनातील सर्व विभागांतून दिव्यांग कलाकारांच्या कलाकृतींसाठी 'खास पारितोषिक' देण्यात येते. या पारितोषिकासाठी पात्र ठरण्याकरिता दिव्यांग कलाकाराकडे शरीराच्या वरच्या अथवा खालच्या**

**भागातील किमान ४० टक्के, किंवा दोन्ही भाग मिळून किमान ५० टक्के कायमस्वरूपी विकलांगता असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे वैध प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. हे प्रमाणपत्र** doa.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावरील दिलेल्या लिंकवर अपलोड करणे आवश्यक आहे. कलाकृतीची प्रदर्शनासाठी निवड झाल्यास, ती प्रत्यक्ष सादर करताना सदर प्रमाणपत्राची प्रत जोडणे बंधनकारक राहील. प्रमाणपत्र सादर न केल्यास कलाकृती स्पर्धेतून बाद करण्यात येईल.**

७) दिव्यांग कलाकारांना सामान्य विभाग व दिव्यांग विभाग अशा दोन्ही विभागात भाग घेता येईल. त्यांनी दोन्ही विभागात भाग घेतल्यास दोन्ही विभागाची रक्कम भरावी लागेल.

८) प्रदर्शनामध्ये विक्री होणाऱ्या कलाकृतीच्या विक्रीच्या २० टक्के रक्कम वजाती करुन उर्वरित रक्कम कलाकारास प्रदान केली जाईल व वसूल केलेल्या २० टक्के रकमेची शासकीय पावती संबंधित कलाकाराला देण्यात येईल.

९) कलाकृतीचे विभागानुसार आकारमान खालीलप्रमाणे.

| विभाग | कमीत कमी | जास्तीत जास्त |
|---|---|---|
| रेखा व रंगकला विभाग | ४० से.मी. x ३० से.मी. | १२० से.मी. ते १५० से.मी. |
| मुद्राचित्रण विभाग | | |
| उपयोजित कला विभाग | ४० से.मी. x ३० से.मी. | ७५ से.मी. x ५० से.मी. |
| छायाचित्रण विभाग | | |
| शिल्पकला विभाग | १२० से.मी. x १२० से.मी. x ९० से.मी.<br>वजन १२५ किलोपेक्षा जास्त नसावे. | |

१०) एखाद्या विभागात कलाकृतीचा दर्जा पारितोषिकाकरीता पात्र न ठरल्यास त्या विभागाकरिता पारितोषिक दिले जाणार नाही.

११) **प्रदर्शनासाठी पाठवलेली कलाकृती ही इतर कोणत्याही कलाकृतीची नक्कल, प्रतिकृती (Reproduction) किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर करून तयार केलेली नसावी. ती पूर्णपणे कलाकाराची स्वतःची मूळ निर्मिती असणे अनिवार्य आहे. प्रदर्शनासाठी निवड झालेल्या प्रत्येक कलाकृतीसोबत यासंबंधीचे स्वाक्षरी केलेले स्व-घोषणापत्र (Self-Declaration/Certificate) सादर करणे आवश्यक आहे. असे प्रमाणपत्र जोडले नसल्यास, संबंधित कलाकृती प्रदर्शनासाठी स्वीकारली जाणार नाही.**

१२) प्रत्येक कलाकृती काचेविना योग्य फ्रेममध्ये केलेली असावी. आवश्यक असल्यास ॲक्रॅलिक शिटचा वापर करावा.

१३) **प्रदर्शनासाठी निवड झालेल्या कलाकृती** या संचालनालयाकडून नमूद केलेल्या तारखेस पाठविण्यात याव्यात. अंतिम तारखेनंतर प्रदर्शनाकरीता येणाऱ्या कलाकृती स्विकारल्या जाणार नाहीत.

१४) **प्रदर्शनासाठी निवड झालेल्या कलाकृतींची योग्य ती काळजी घेतली जाईल. तथापि, नैसर्गिक आपत्ती, अपघात किंवा इतर कोणत्याही अनपेक्षित कारणांमुळे कलाकृतीचे नुकसान झाल्यास अथवा ती गहाळ झाल्यास कला संचालनालय जबाबदार राहणार नाही. कलाकारांनी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक वाटल्यास स्वतःच्या खर्चाने आपल्या कलाकृतीचा विमा (Insurance) उतरवून घ्यावा.**

१५) कला प्रदर्शन संपल्यानंतर, कलाकार विभागात जमा केलेल्या कलाकृती १० दिवसांच्या आत परत घेऊन जाण्याची व्यवस्था करावी. विहित कालावधीत कलाकृती परत न नेल्यास आणि त्यानंतर तिचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास किंवा ती गहाळ झाल्यास कला संचालनालय जबाबदार राहणार नाही; तसेच या संदर्भातील कोणतीही तक्रार किंवा दावा विचारात घेतला जाणार नाही. कलाकृती प्रदर्शनासाठी सादर

करण्याची आणि ती वेळेत परत नेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कलाकाराची राहील. निश्चित मुदतीनंतरही कलाकृती न नेल्यास, त्यावर संबंधित कलाकाराचा कोणताही हक्क राहणार नाही आणि अशा कलाकृतींबाबत योग्य तो निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करण्याचा संपूर्ण अधिकार कला संचालनालयाकडे राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

१६) प्रदर्शनासाठी निवड झालेल्या प्रत्येक कलाकृतीच्या मागील बाजूस कलाकाराने फक्त खालील मजकुरच ठळक व स्पष्ट अक्षरात नमूद करावा, त्याच्या व्यतिरिक्त इतर काही मजकूर असल्यास सदर कलाकृती बाद ठरविण्यात येईल.

✂.......................................✂.................................✂.............,..............

| | | |
|---|---|---|
| कलाकाराचा ऑनलॉईन रजिस्टर आयडी | : | ............................................................ |
| विभाग (रेखा व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला, मुद्राचित्रण दिव्यांग यापैकी) | : | .................................................. |
| कलाकृतीचे शिर्षक | | ............................................ |
| कलाकृतीचे विक्री मुल्य | | ............................................. |

✂....................✂.............................✂...........................✂.......✂.........✂.

१७) राज्यकला प्रदर्शनाच्या कलाकार विभागाच्या कलाकृती निवड प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या सदस्यास / उमेदवारास तसेच प्रदर्शन समिती सदस्यास महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनामध्ये कलाकृती सादर करता येणार नाही.

१८) महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात भाग घेतलेल्या कलाकृतीबाबत काही वाद अथवा पेचप्रसंग उद्भवल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार हा प्रदर्शन समिती तसेच कला संचालकांचा राहील.

१९) प्रदर्शन कालावधी सुरू असताना कोणत्याही कारणास्तव कलाकृती कलाकाराला परत दिली जाणार नाही.

---------- x ----------